महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा क्रः तंशिविकापु/विवि/बीबीए-बीसीए २०२४-२५/२०२४/ 3295 दिनांक : ०९.०८.२०२४

12 AUG 2024

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली मान्यताप्राप्त
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड व
एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्था
पुणे विभाग.

**विषयः शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करुन संचालनालयाच्या मान्यतेबाबत..**

संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, शासन निर्णय क्र. मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४, दिनांक ०७.०८.२०२४.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/डीटीई मान्यता/२०२४/५७९ दिनांक ०८.०८.२०२४.
३) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/बीबीए-बीसीए२०२४-२५/२०२४/३२७६ दिनांक ०९.०८.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक ३ मधील परिपत्रकामध्ये कळविल्यानुसार या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणा-या बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थां व पूर्वीपासून तंत्रशिक्षण संचालनालयाचा अंतर्गत (डिटीई सांकेतांक प्राप्त) असलेल्या संस्था यांनी संदर्भ क्रमांक २ मधील परिपत्रकामधील मुद्दा क्रमांक २ नुसार कागदपत्रांची एक **सत्यप्रत** या विभागीय कार्यालयाकडे सादर करण्यासाठी व डिटीई सांकेतांक व पासवर्डचा उपयोग करुन प्रवेशासाठी आवश्यक ती माहिती ugpg24.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्ययावत करण्यासाठी खालीलप्रमाणे जिल्ह्यानिहाय वेळापत्रक देण्यात येत आहे.

संस्था ज्या जिल्ह्यामध्ये कार्यरत आहे त्या जिल्ह्यासाठी दिलेल्या दिवशी संस्थांनी उपरोक्त नुसार कागदपत्रांची एक **सत्यप्रत** असलेली फाईल व त्याची मूळप्रत (विभागीय कार्यालयाकडून तपासणीसाठी) घेऊन या विभागीय कार्यालयामध्ये उपस्थित रहावे.

ज्या संस्था उपरोक्त कागदपत्रांची पूर्तता करतील अशा संस्था त्यांच्या संस्थेची केंद्रिभूत प्रवेशासाठी आवश्यक ती माहिती त्यांना प्राप्त डिटीई सांकेतांक व पासवर्डचा उपयोग करुन ugpg24.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्ययावत करुन तसेच पोर्टलवर नमूद कागदपत्रे अपलोड करुन संस्थेच्या लॉगीनमधून ती माहिती लॉक करुन प्रवेश पडताळणीसाठी या विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने **दिनांक २१.०८.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** सादर करावयाची आहे. तसेच संस्थेने नोंदविलेली माहिती लॉक करण्यापूर्वी ती अचूक असल्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. सदरची माहिती प्रवेशप्रक्रियेसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे उपयोगात आणण्यात येणार असल्याने त्याची संवेदनशीलता विचारात घेऊन संस्थांनी माहिती अद्ययावत करावी. ज्या संस्था विहीत मुदतीत माहिती अद्ययावत करणार नाहीत त्या संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत होणार नाही याची संस्थांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

## कागदपत्रे सादर करण्याकरिताचे वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | सत्र | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | १६.०८.२०२४ | सकाळचे सत्र | सांगली जिल्ह्यातील संस्था. |
| २ | | दुपार नंतरचे सत्र | कोल्हापूर जिल्ह्यातील संस्था. |
| ३ | १९.०८.२०२४ | सकाळचे सत्र | सातारा जिल्ह्यातील संस्था. |
| ४ | | दुपार नंतरचे सत्र | सोलापूर जिल्ह्यातील संस्था. |
| ५ | २० व २१.०८.२०२४ | -- | पुणे जिल्ह्यातील संस्था. |

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई (कार्यासन क्र. २) यांना माहितीस्तव.